स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मानव विदयाशाखेंतर्गत

इतिहास विषयातील पीएच.डी पदवीच्या नियोजित संशोधनासाठी सादर करावयाचा आराखडा

“१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण सुधारकांच्या विचारांची व योगदानाची आजची प्रासंगिकता”

संशोधक

प्रविण लक्ष्मणराव कदम

एम.ए.इतिहास

मार्गदर्शक

प्रो.डॉ.परिमल सुतवणे

इतिहास विभाग प्रमुख

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

संशोधन केंद्र

ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी

<u>प्रस्तावना :</u>

१९ व्या शतकामध्ये भारताच्या व महाराष्ट्राच्या सर्वांगीन जिवनात काही महत्वपूर्ण असे बदल घडून आले. कारण इ.स. १८१८ ला मराठी सत्तेच्या अस्तानंतर या ठिकाणी इंग्रजी सत्तेला सुरूवात झाली. या पाश्चात्य संस्कृतीमूळे महाराष्ट्राचा सर्वांगीन बदल घडून येवू लागला. इंग्रजी सत्तेच्या आमलामुळे महाराष्ट्राचा राजकीय सामाजिक, धार्मिक व आर्थीक क्षेत्रात बदल घडून आले. ब्रिटीश सत्तेमुळे जुन्या चालीरीती,रुढी,परंपरा,अंधश्रध्दा इत्यादीवर आघात होऊ लागला. थोडक्यात १९ वे शतक हे महाराष्ट्राच्या सर्वांगिन जिवणात महत्वपूर्ण असे ठरले. यामध्ये सर्वात महत्वपूर्ण मुद्दा येतो, तो म्हणजे शिक्षण.

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे एक प्रभावी साधन आहे. कारण समाज प्रगत करायचा असेल तर शिक्षणावाचून पर्याय नाही. त्यामुळे सुरूवातीच्या काळात देखील शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तन झाल्याचे अपणाला दिसून येईल. यामध्ये सर्वात महत्वाची भुमीका ठरते ती म्हणजे १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण सुधारकांची. कारण शिक्षणामुळे समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळन मिळवून देण्याचे काम झाल्याचे दिसते. शिक्षणातील विचार प्रवाह आपल्या आचार विचार आणि लेखणीद्वारे समाजापर्यंत पोहचविण्याचे काम शिक्षण सुधारक करत असतात. म्हणून सदर शिक्षण सुधारकांच्या विचारांची आणि योगदानाची आजच्या काळात काय गरज आहे हे शोधण्याचे काम प्रस्तुत प्रबंधात केले गेले आहे.

१९ व्या शतकामध्ये ब्रिटीश सत्ता आमलात आली. त्यावेळी भारतीयांना कुठल्याही प्रकारचा शास्त्रीय दृष्टीकोन नव्हता. समाजात अज्ञान पसरले होते. कारण त्या अगोदर शिक्षणाचा फारसा प्रसार झाला नव्हता. परंतु सदर शिक्षण सुधारकांनी आपल्या लेखणी द्वारे, व्याख्यानाद्वारे शिक्षणात क्रांती घडवून आणली. यामुळे शिक्षण किती महत्वाचे आहे, हे समाजाला समजायला लागले. कारण या शिक्षण सुधारकांना असे वाटत होते की, समाज प्रगत करायचा असेल तर शिक्षणावाचून पर्याय नाही. त्यामुळे त्यांनी शिक्षणाची दारे सर्व जातीधर्मासाठी खूली केली. म्हणून प्रस्तुत प्रबंधामध्ये १९ व्या शतकातील सदर शिक्षण सुधारकांच्या विचारांचा आणि योगदानाचा आढावा घेतला गेला आहे. त्यामध्ये

जगन्नाथ शंकर सेठ, विष्णूशास्त्री चिपळूनकर, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, महादेव गोविंद रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादी शिक्षण सुधारकांच्या कार्याचा उल्लेख केला गेला आहे.

शिक्षणाने समाज प्रगत होईल, लोकांना चांगले वाईट समजायला लागेल, लोक ज्ञानी होतील, आणि त्यांना देश, राष्ट्र ही संकल्पना समजेल या दृष्टीकोनातून सदर शिक्षण सुधारकांनी स्वत:ची पर्वा न करता समाजात शिक्षण द्यायला सुरूवात केली. यासाठी त्यांनी संस्थेची, शाळेची स्थापना केली. आणि यामधून आपल्या शिक्षणाला सुरूवात केली. काहींनी घरोघरी जावून मुलांना शाळेत पाठविण्याचा आग्रह धरला. यासाठी महात्मा ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा उल्लेख करता येईल. इंग्रजांनी भारतामध्ये इंग्रजी शिक्षण द्यायला सुरूवात केली. अर्थात यामागे त्यांचा हेतू भारतातून नोकर मिळविणे आपल्या धर्माचा प्रसार करणे हाच होता. परंतु सदर शिक्षण सुधारकांचे कार्य यासाठी फार महत्वाचे ठरले. समाजात परिवर्तन घडून आले त्यामुळे एका नवीन पिढीचा उदय झाला. यामुळे समाजाची वैचारीक प्रगती साधली गेली आणि समाजातील अंधश्रध्दा, कर्मकांड, रुढीपरंपरा दुर झाली व सामाजिक विकास साधला गेला.

या सर्व शिक्षण सुधारकांची आज खरच सद्य स्थितीत गरज आहे का ? त्यांचे हे योगदान आजच्या शिक्षण पध्दतीमध्ये महत्वाचे आहे का ? त्यांनी केलेले कार्य आजच्या पिढीला महत्वाचे आहे का ? या सर्वांची उत्तरे शोधण्या करीता प्रस्तुत प्रबंधामध्ये त्यांचे योगदान हे उपरोक्त समस्या वरील उपाय योजना करण्यासाठी मार्गदर्शक ठरेल याचा शोध घेण्याचा प्रयत्न या प्रबंधामध्ये केला गेला आहे.

<u>समस्या सुत्रण :-</u>

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये शिक्षण सुधारकांच्या विचारांची आज काय गरज आहे याचा शोध घेतला आहे. कारण आजच्या शिक्षण व्यवस्थेला सदर शिक्षण सुधारकांच्या विचारांची व योगदानाची गरज आहे. कारण आज सद्य स्थितीत शालेय विद्यार्थ्यांचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, शाळेतील गळतीचे प्रमाण कमी झाले आहे.

याचे कारण परिक्षा पध्दत किंवा परिक्षा पध्दतीतील दोष हे ही असू शकते. यामूळे समाजाची अधोगती होत आहे असे दिसून आले. यावरील उपाय म्हणजे सदर शिक्षण सुधारकांच्या विचारांची व योगदानाची आज गरज आहे. कारण विद्यार्थ्याला शिक्षणा बद्दल आवड निर्माण होईल व यातून ते उत्तम नागरीक घडतील. यामुळे सदर शिक्षण सुधारकांच्या शैक्षणिक विचारांचा व त्यांच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे.

संधोषन विषयाची निवड :-

प्राचीण काळापासून भारतातील समाज जिवनाचा अभ्यास केला असता, असे दिसून येईल की त्या काळामध्ये समाज हा प्रगत नव्हता, समाजात फक्त अंधश्रध्दा रुढी, परंपरा या प्रचलित होत्या. समाज हा फक्त देवी, देवतांवर विश्वास ठेवणारा होता. त्यामुळे लोकांना शिक्षणाचे ज्ञान नव्हते म्हणजे समाजात अज्ञान पसरले होते. याच अज्ञानाचा फायदा परकीय सत्तांनी घेतला व या ठिकाणी त्यांनी आपले राज्य निर्माण केले. यामध्ये पोर्तुगिज, इंग्रज, फ्रेंच, डच या सत्तांनी भारतामध्ये आपल्या वसाहती निर्माण केल्या. जर देशाला या परकीय सत्तांपासून मुक्त करायचे असेल तर शिक्षणा वाचून पर्याय नाही. त्यामुळे १९ व्या शकतकामध्ये शिक्षणामुळे समाजात जास्त प्रगती झाल्याचे आपणाला दिसून येईल.

१९ व्या शतकामध्ये सदर शिक्षण सुधारकांचे कार्य त्यामध्ये त्यांचे शैक्षणिक कार्य समाज प्रगत करण्याच्या दृष्टीकोनातून फार महत्वाचे ठरते. म्हणून प्रस्तुत प्रबंध करण्यासाठी या शिक्षण सुधारकांच्या विचारांची व योगदानांची आज काय गरज आहे हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

पूर्वज्ञान :-

प्रस्तुत प्रबंधामध्ये संशोधन करीत असतांना सदर शिक्षण सुधारकांच्या शैक्षणिक कार्याचा आणि त्यांच्या योगदानाचा अभ्यास केला गेला आहे. सध्याची शैक्षणिक अवस्था

पाहता त्यांचे कार्य आजच्या घडीला फार मोलाचे ठरते. यासाठी सदर शिक्षण सुधारकांचा अभ्यास करून त्यांच्या कार्यावरील वेगवेळ्या ग्रंथाचा अभ्यास करून तसेच त्यांच्यावर झ ाालेल्या संशोधनाचा अभ्यास करून सदर प्रबंधाचा अभ्यास केला गेला आहे.

<u>संशोधनातील उद्दिष्टे:-</u>

प्रस्तुत प्रबंध पूर्ण करण्यासाठी काही उद्दिष्टे समोर ठेवून पूर्ण केला गेला आहे. ती उद्दिष्टे थोडक्यात पुढील प्रमाणे :-

१. सदर शिक्षण सुधारकांच्या शैक्षणिक कार्याचा विस्तृत अभ्यास करून चिकित्सा करणे.
२. १९ व्या शतकातील शैक्षणिक परिवर्तनाचा आढावा घेणे.
३. १९ व्या शतकातील स्त्री शिक्षणाचा इतिहास अभ्यासणे.
४. १९ व्या शतकातील कौशल्याधिष्ठीत शिक्षणाचा समाजावरील परिणाम अभ्यासणे.
५. १९ व्या शतकातील शिक्षणाची सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिणामाची चिकित्सा करणे.
६. १९ व्या शतकातील शिक्षण पध्दतीवर पाश्चीमात्य शैक्षणिक विचारांचा झालेला प्रभाव अभ्यासणे.
७. १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील ब्रिटीश कालीन शिक्षण पध्दती अभ्यासणे.
८. १९ व्या शतकातील विविध सामाजिक, शैक्षणिक संघटानांचा चिकित्सक अभ्यास करणे.
९. सदर शिक्षण सुधारकांच्या विचारांची आजच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये गरज काय त्याचा अभ्यास करणे.

<u>ग्रहितके :-</u>

प्रस्तुत प्रबंध पूर्ण करतांना काही ग्रहितकांचा विचार करण्यात आला आहे.

१. सद्य स्थितीतील शैक्षणिक धोरणामध्ये सदर शिक्षण सुधारकांच्या विचारांची आणि योगदानाची आवश्यकता आहे.
२. गतकाळातील शिक्षण क्षेत्रात सदर शिक्षण सुधारकांच्या कार्यामुळे परिवर्तन झाले.

३. सद्य स्थितीतीत शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षण सुधारकांच्या कौशल्य विकासाच्या धोरणांची आज आवश्यकता आहे.
४. विद्यार्थ्यांना सद्य स्थितीत शिक्षणाकडे आकर्षित करण्यासाठी सदर शिक्षण सुधारकांच्या कार्याची व योगदानाची आवश्यकता आहे.
५. प्रचलित शिक्षण पध्दतीतील विविध दोष दुर करण्यासाठी सदर शिक्षण सुधारकांचे विचार प्रभावी आणि उपयुक्त आहेत.

<u>संशोधन पध्दती :-</u>

प्रस्तुत प्रबंध पूर्ण करण्यासाठी काही संशोधन पध्दतीचा अभ्यास करण्यात आला आहे. त्यामध्ये ऐतहासिक वर्णनात्मक, विश्लेषनात्मक, क्षत्रिय भेट, ग्रंथालय अध्यायन, प्रश्नावली ईत्यादीचा समावेश आहे.

<u>संशोधनाची व्याप्ती :-</u>

प्रस्तुत शोध प्रबंधात १९ व्या शतकातील शिक्षण सुधारकांच्या केवळ शैक्षणिक कार्यांची आणि त्यांच्या शैक्षणिक योगदानाची संशोनात्मक मांडणी केली आहे.

१. महात्मा फुले यांचा सन १८४८ ते १८५२ या काळातील शैक्षणिक कार्याची माहिती अवगत करणे.
२. जगन्नाथ शंकर सेठ यांच्या १८२४ ते १८५७ पर्यंत केलेल्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकणे.
३. विष्णूशास्त्री चिपळूनकर यांच्या सन १८७२ ते १८९१ या काळातील शैक्षणिक कार्याची माहिती घेणे.
४. भारतातील पहिल्या महिला शिक्षीका सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षण कार्याचा आढावा घेणे.
५. महादेव गोविंद रानडे यांचे प्राध्यापक, न्यायमुर्ती म्हणून केलेल्या शैक्षणिक कार्य अभ्यासणे.
६. महर्षी धोंडो केशव कर्वे स्त्री शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

तसेच अनाथ बालिका आश्रम या संस्थे अंतर्गत त्यांचे स्त्री शिक्षण विषयक विचार अभ्यासणे.

<u>प्रकरण आराखडा :-</u>

<u>प्रकरण १ ले : १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील धार्मिक, सामाजिक, आर्थिक,राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थिती</u>

प्रस्तुत प्रकरणामध्ये एकंदरीत १९ व्या शतकातील महाराष्ट्राच्या संपूर्ण जिवनाचा आढावा घेण्यात आला आहे. यामध्ये तत्कालीन समाज, रुढी, परंपरा, अंधश्रध्दा, गुलामगिरी, सामाजिक समस्या, इंग्रजी शिक्षण, स्वदेशी शिक्षण इत्यादीची माहिती घेण्यात आली आहे. थोडक्यात तत्कालीन धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक परिस्थितीचा आढावा घेतला आहे.

<u>प्रकरण २ रे : १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था</u>

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९ व्या शतकातील महाराष्ट्रात शिक्षण व्यवस्थेत झ ालेले बदल यांचा आढावा घेण्यात येईल. त्यामध्ये ब्रिटीश कालीन महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करण्यात येईल. ब्रिटीशांनी शिक्षणा संदर्भात नेमलेले वेगवेगळे आयोग - १८१३ चा चार्टर ॲक्ट, १९३५ चा मेकॉले अहवाल, १८५४ चा वूडचा खलीता आणि १८८२ चा हन्टर आयोग इत्यादीचा अभ्यास करण्यात येईल.

<u>प्रकरण ३ रे : १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण सुधारकांचा परिचय व शैक्षणिक कामगिरी -</u> भाग १

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९ व्या शतकातील महाराष्ट्रात होऊन गेलेले शिक्षण सुधारक त्यांचे कार्य व योगदान करीता अभ्यास करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने -

१. श्रीमंत जगन्नाथ शंकर सेठ- परिचय, शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यास करणे.
२. निबंधमालाकार विष्णूशास्त्री चिपळुनकर- परिचय, शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यास करणे.
३. महात्मा ज्योतीबा फुले - परिचय, शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यास करणे.

प्रकरण ४ रे : १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शिक्षण सुधारकांचा परिचय व शैक्षणिक कामगिरी - भाग २

प्रस्तुत प्रकरणामध्ये १९ व्या शतकातील महाराष्ट्रात होऊन गेलेले शिक्षण सुधारक त्यांचे कार्य व योगदान करीता अभ्यास करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने -

१. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले- परिचय, शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यास करणे.

२. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे-परिचय, शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यास करणे.

३. महर्षी धोंडो केशव कर्वे-परिचय, शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यास करणे.

प्रकरण ५ थे : महाराष्ट्रातील शैक्षणिक सद्यस्थिती आणि वरील शिक्षण सुधारकांच्या कार्याची आजची प्रासंगिकता

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील सदर शिक्षण सुधारकांच्या शैक्षणिक विचारांची व योगदानाची आजच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये काय गरज आहे. याचा आढावा संशोधनातील उपलब्ध पुराव्याच्या आधारे घेण्यात येईल व उपाययोजना सुचविण्यात येतील.

प्रकरण ६ वे : सारांश

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील प्रमाणे उपलब्ध मुळ साधनांची मांडणी करून सदर संशोधक विद्यार्थी हाती आलेले निष्कर्ष सादर करणार आहेत. त्या निष्कर्षातुनच संशोधन करण्यात येईल.

प्रस्तुत नियोजित संशोधनाच्या आराखड्यात संशोधना दरम्यान बदल होण्याची शक्यता होणे नाकारता येत नाही.

संदर्भग्रंथ सूची :-

१. आधुनिक भारत - श.द.जावडेकर, पूणे १९७९

२. म.गो.रानडे यांचे चरीत्र - न.रा.फाटक, पूणे १९६६

३. सावित्रीबाई फुले यांचे चरीत्र - सुजाता टिकेकर

४. सावित्रीबाई फुले - प्रा.दिलीप गरड

५. विष्णूशास्त्री चिपळूनकर यांचे चरीत्र - ल.कृ.चिपळूनकर, पूणे १८९४
६. आधूनिक मराठी साहित्याची समिक्षा आणि रससिध्दांत- लक्ष्मणशास्त्री जोशी, पूणे १९७२
७. चिपळूनकर काल आणि कर्तृत्व - माडखोलकर ग.त्र्य., अमरावती १९५४
८. महाराष्ट्राचे शिल्पकार महात्मा ज्योतीबा फुले - श्रीराम गुंदेकर
९. महात्मा ज्योतीबा फुले - धनंजय कीर, २०२०
१०. महर्षी अण्णासाहेब कर्वे - दा.न.शिखरे, पूणे १९५२
११. महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास (१८०० ते १९६०) डॉ.किशोरकुमार गव्हाणे / डॉ.एस.पी.शिंदे
१२. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास- डॉ.दीपा सावळे/ मोरे

मार्गदर्शक

प्रो.डॉ.परिमल सुतवणे

इतिहास विभाग प्रमुख

श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

संशोधक

प्रविण लक्ष्मणराव कदम